# एमआयडीसीतील आठ एकरवर 'ट्री पार्क'

## उद्योजक पटवर्धन यांची माहिती : रत्नागिरीत आसमंत बेनेव्हलन्स फाउंडेशनचा उपक्रम

**मकरंद पटवर्धन** : सकाळ वृत्तसेवा

रत्नागिरी, ता. १६ : रत्नागिरी एमआयडीसीमधील ८ एकरच्या प्लॉटवर आसमंत बेनेव्हलन्स फाउंडेशन ट्री पार्क (वनस्पती उद्यान) उभारणार आहे. सध्या येथे असलेली जैवविविधता जपतानाच अनेक प्रकारची उपयुक्त झाडे लावण्यात येणार आहेत. पक्ष्यांचा अधिवास वाढवणे, बियांची साठवणूक केली जाणार आहे. त्यातून पक्षीनिरीक्षण, वनस्पतिशास्त्रावर संशोधन करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे. ज्येष्ठ पक्षीनिरीक्षक किरण पुरंदरे यांच्या नेतृत्वाखाली 'आसमंत'चा नवा उपक्रम सुरू झाल्याची माहिती उद्योजक नंदकुमार पटवर्धन यांनी 'सकाळ'ला दिली.

याकरिता एमआयडीसीतील खुली जागा घेतली आहे. सध्या येथे विविध प्रकारच्या वनस्पती, झाडेझुडपे, गवत आणि विविध पक्ष्यांचा अधिवास आहे. युकेलिप्टस वनस्पती जास्त प्रमाणात आहे; मात्र त्यामुळे पक्ष्यांना घरटे बांधण्यात अडचणी येतात. त्यामुळे येथे पक्ष्यांचा अधिवास वाढविण्यासाठी येथे वीस प्रकारची झाडे लावली जाणार आहेत. या जागेत 'आसमंत'चे कार्यालय आणि विविध झाडांच्या बियांची साठवणूक (सीड बँक) करण्यात येणार येणार आहे. पक्ष्यांचा अधिवास वाढल्यानंतर विद्यार्थ्यांना पक्षी निरीक्षणासाठी दुर्बीणही उपलब्ध करून दिली जाईल. वनस्पतिशास्त्रावर अभ्यास करण्यासाठी विद्यार्थ्यांना संधी मिळेल, असे पटवर्धन यांनी सांगितले.

या जागेची जैवविविधता जपण्यासाठी येथे फारशी साफसफाई केली जाणार नाही. कारण गवत किंवा झाडा-झुडपांमध्येही छोटे कीटक, किडामुंगी वास्तव्यास असतात. ते पक्ष्यांचे खाद्य असल्याने या जागेत ढवळाढवळ न करता विविध प्रकारची झाडे लावण्यावर भर दिला जाणार आहे.

सीता, अशोक, सातरिठा, ऐन, औदुंबर, पिंपळी, सुंदरी, भारंग, वड, पळस, कुद्धासकोकोनट, कुत्कर, कुरू, रुद्राक्ष, सोमसावर, काटेसावर, कळंब, टेट्टू, खरळ आदी वीस प्रकारची झाडांचा समावेश आहे. साधारण तीन ते पाच वर्षांची वाढ झालेली झाडे लावली जातील. या जागेची पान २ वर ▶



रत्नागिरी : येथील एमआयडीसीच्या या आठ एकर जागेवर आसमंत फाउंडेशनतर्फे 'ट्री पार्क' उभारण्यात येणार आहे.

दृष्टिक्षेप | पक्ष्यांचा अधिवास | सीड बँक करणार | विद्यार्थ्यांना संशोधनाची संधी | वीस प्रकारची झाडे लावणार

# एमआयडीसीतील आठ एकरांवर 'ट्री पार्क'

▶पान १ वरून

पाहणी केली असता येथे शांतता असून जंगलभाग आहे. तसेच बुलबुल, चिमण्या, भारद्वाजसह अनेक पक्ष्यांचे वास्तव्य आढळून आले. गतवर्षी पक्षी निरीक्षणाचा कार्यक्रम घेतला होता. त्यातूनच 'ट्री पार्क'ची संकल्पना सुचली. चार महिन्यांपूर्वी या कामाला सुरवात झाल्याचे त्यांनी सांगितले.



रत्नागिरी : या मोकळ्या जागेत पक्ष्यांचा अधिवास वाढवण्यासाठी वृक्षलागवड व संवर्धन केले जाईल.

गेल्या पाच वर्षांपासून आसमंत फाउंडेशन नावीन्यपूर्ण कार्यक्रम राबवत आहे. यामध्ये निरीक्षणगृहातील विद्यार्थ्यांसाठी दर महिन्याला दुधाचा खर्च, शहरातील शाळांमधील ३० विद्यार्थ्यांचा शैक्षणिक खर्च, गणवेश वाटप, मेळघाटातील कुपोषित बालके, मातांसाठी मैत्री संस्थेला २१ हजार रुपयांची मदत, विद्यार्थ्यांसाठी गणेशमूर्ती तयार करण्याची स्पर्धा असे उपक्रम राबवले जातात. इलेक्ट्रिक स्वीचगिअर आणि ऑटोमेशन उद्योजक पटवर्धन यांच्या संकल्पनेतून ही संस्था २०१० पासून कार्यरत आहे. विद्यार्थी, पर्यावरण संवर्धन आणि शास्त्रीय संगीताच्या प्रचार, प्रसारावर आधारित उपक्रम फाउंडेशन राबवते. संस्थेला शिल्पाताई पटवर्धन, सुधीर गाडगीळ, किरण पुरंदरे, डॉ. प्रशांत पटवर्धन यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळत आहे.

**विद्यार्थ्यांसाठी 'संकल्प उपक्रम'**

आसमंत फाउंडेशन १ जानेवारी २०१६ पासून राजापूर हायस्कूलमध्ये सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी ध्येयनिश्चितीचा आगळा उपक्रम प्रायोगिक तत्त्वावर राबविणार आहे. विद्यार्थ्यांनी एक ध्येय, संकल्प ठरवून तो लिहायचा व दर महिन्याभराने तो पूर्ण केला किंवा कसे हे लिहायचे आहे. त्याचे मूल्यमापन केले जाईल. पुढील शैक्षणिक वर्षी आठवीसाठी हा उपक्रम घेतला जाईल. संकल्पपूर्ती करणाऱ्या निवडक विद्यार्थ्यांना नववी, दहावीमध्ये शैक्षणिक सुविधांसाठी आसमंततर्फे मदत दिली जाईल, असे पटवर्धन यांनी सांगितले.